वाशिम जिल्हा बॅण्डस्मन पोलीस शिपाई भरती-2024-2025
उमेदवारांना लेखी परीक्षेकरीता सुचना.

वाशिम जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई/बॅन्डस्मन संवर्गातील 40 पदे व पोलीस शिपाई चालक संवर्गाची 08 पदे असे एकुण 48 रिक्त पदे भरणेकामी पोलीस भरती सन 2024-2025 ची प्रक्रिया दिनांक 11-02-2026 ते 18-02-2026 रोजी पर्यंत मैदानी चाचणी पुर्ण करण्यात आली असुन **पोलीस शिपाई बॅन्डस्मन या पदाची लेखी परीक्षा दि.11.04.2026 रोजी सकाळी 08.00 वाजता पोलीस अधिक्षक कार्यालय, काटा रोड,वाशिम** येथे घेण्यात येणार आहे. तरी उमेदवारांनी लेखी परीक्षा ठिकाणी 02 तास आधी 06.00 वाजता हजर राहावे.

उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना:-

1) उमेदवारांनी मैदानी चाचणी च्या वेळी ऑनलाईन काढलेले प्रवेशपत्र तसेच या कार्यालयाकडुन मैदानी चाचणी संपल्यानंतर दिलेले ओळखपत्र पिवळे (पुरुषा करीता) व गुलाबी (महिला करीता) तसेच लेखी परीक्षेकरीता ऑनलाईन काढलेले प्रवेशपत्र सोबत घेउन यावे. उपरोक्त नमुद मुळ ओळखपत्र उमेदवारांकडे असतील तरच परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल याबाबत नोंद घ्यावी. ऑनलाईन परिक्षेचा फॉर्म भरतेवेळी उमेदवार यांनी अपलोड केलेला फोटोच्या 02 प्रती सोबत आणाव्यात.
2) प्रवेश पत्र आणि पासपोर्ट साईज फोटो हया शिवाय इतर कोणतीही वस्तु/साहित्य सोबत घेउन येउ नये. अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.
3) लेखी परीक्षा 90 मिनिटांची व 100 गुणासाठी आहे. परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल.
4) उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापुर्वी किमान दोन तास अगोदर हजर रहावे.
5) परीक्षा केंद्रावर उमेदवारांस बॉल पॉइंट पेन व लेखनसाठी रायटींग पॅड पुरविण्यात येतील.
6) प्रस्तुत उत्तरपत्रिका ही कार्बनलेस या प्रकारातील असुन,दोन प्रतित असेल.परीक्षेचा कालावधी संपेपर्यत उत्तपत्रिकेचा भाग-02 मुळ उत्तर पत्रिकेपासुन कोणत्याही परिस्थितीत वेगळा करु नये.
7) उमेदवार कॉपी करताना आढळुन आल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.तसेच त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल.
8) परीक्षा केंद्रात दुरध्वनी (मोबाईल फोन)/डिजीटल डायरी/मायक्रोफोन/मायक्रो कॅमेरा डिव्हाईस/कॅलक्युलेटर/डिजिटल नोट पॅड/नोटस पुस्तके/ईअरफोन/हिअरिंग एड डिव्हाईस/स्मार्ट वॉटचेस, स्मार्ट आय ग्लासेस इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होउ शकतो असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवार आढळुन आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवुन त्यांची उमेदवारी रदद करण्यात येईल. तसेच कसुरदारविरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम 2024 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

पोलीस अधीक्षक वाशिम

(अनुज तारे)
पोलीस अधीक्षक,वाशिम